महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७० /२०२३ दि. २०/०१/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत कुलकर्णी ब्रदर्स, गुप्ते रोड, डोंबिवली पश्चिम येथे भारतीय जनता पक्ष डोंबिवली पश्चिम तर्फे **'राम मंदिर प्राणप्रतिष्ठा'** निमित्त दि. २२/०१/२०२४ रोजी विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. सदर कार्यक्रमास असंख्य भाविक व विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** गुप्ते रोडने गोमंतक बेकरी कडून मच्छी मार्केट मार्गे डोंबिवली रेल्वे स्टेशन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गोमंतक बेकरी कॉर्नर** येथे तसेच डोंबिवली रेल्वे स्टेशन कडून मच्छी मार्केट मार्गे गुप्ते रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मच्छी मार्केट, रेल्वे स्टेशन गेट समोर, डोंबिवली पूर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** गुप्ते रोडने गोमंतक बेकरी कडून मच्छी मार्केट मार्गे डोंबिवली रेल्वे स्टेशन कडे येणारी वाहने रसरंजन हॉटेल गल्ली कडून अथवा महात्मा फुले रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच डोंबिवली रेल्वे स्टेशन कडून मच्छी मार्केट मार्गे गुप्ते रोड कडे जाणारी वाहने रसरंजन हॉटेल गल्ली कडून अथवा महात्मा फुले रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २२/०१/२०२४ रोजी सकाळी ०६:०० ते १६:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीस्तव,**

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण—डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/— सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,**

मा. आयुक्त, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.